## 2 डिसेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर



e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 29/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 281 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com





# महापालिका निवडणूक वेळेवरच होणार!

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे - महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम चालू असतानाच या निवडणुकांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण लागू झाल्याचा मुद्दा चर्चेत आला होता. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यामुळे या निवडणुकांचं भवितव्य अधांतरी राहिलं होतं.आज सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात अंतरिम आदेश दिले असून सध्या प्रक्रिया चालू असलेल्या नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांचा मार्ग न्यायालयाने मोकळा केला आहे. मात्र, या निवडणुका होत असल्या, तरी त्यातील आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडलेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निकालांबाबत न्यायालयाने एक महत्त्वाची अट घातली आहे.**



सरन्यायाधीश सूर्य कांत व न्यायमूर्ती जोयमाला बागची या दोन सदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यासंदर्भातली पुढील सुनावणी तीन सदस्यीय खंडपीठासमोर जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होणार असल्याचं न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं. मात्र, असं करत असतानाच सध्या महाराष्ट्रात चालू असलेल्या नगरपरिषद वा नगरपंचायत निवडणुकांना न्यायालयाने हिरवा कंदील दिला आहे.

यामध्ये ज्या ५७ नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेली आहे, अशा ठिकाणचे निकाल जानेवारी महिन्यात होणाऱ्या सुनावणीतील निकालांवर अवलंबून असतील, असं सर्वोच्च न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं आहे.दरम्यान, जिल्हा परिषद व महानगर पालिका निवडणुकांसंदर्भातल्या अधिसूचना कोणताही विलंब न करता जारी करण्याचे निर्देश न्यायालयाने यावेळी दिले. या निवडणुकांमध्ये ज्या ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेली आहे, अशा ठिकाणचे निकालदेखील जानेवारी महिन्यायत होणाऱ्या सुनावणीच्या निकालांवर अवलंबून असतील, असं न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं.

निवडणुका थांबवता येणार नाहीत -

"राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कारभार गृहीत धरून कामकाज चालवलंय" अशी तक्रार वरीष्ठ वकील विकास सिंह यांनी न्यायालयासमोर केली. मात्र, आधीच उशीर झालेल्या निवडणुका आणखी थांबवता येणार नसल्याचं न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं. त्यामुळे ठरलेल्या नियोजनानुसार निवडणुका होतील हे स्पष्ट झालं.

नगरपरिषदा व नगरपंचायतींवर टांगती तलवार! -सर्वोच्च न्यायालयाने यावेळी निवडणुका घेण्याची परवानगी दिली असली, तरी त्यात एक महत्त्वपूर्ण अटदेखील घातली आहे. ज्या नगरपरिषदा, नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली आहे, अशा ठिकाणी या निवडणुकांच्या माध्यमातून लागलेले निकाल हे जानेवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीतून येणाऱ्या निकालावर अवलंबून असतील, असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

महानगरपालिका निवडणुकांना विलंब नको -

सर्वोच्च न्यायालयाने आज दिलेल्या अंतरिम निकालामध्ये महानगर पालिका निवडणुकांची कोणत्याही विलंबाशिवाय घोषणा केली जावी, असे निर्देश दिले आहेत. राज्यातील एकूण महानगरपालिकांपैकी फक्त २ महानगरपालिकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असून तिथे आरक्षणाची सोडत आणि आरक्षणाची मर्यादा यासंदर्भात पुनर्विचार करण्याबाबत न्यायालयाने निर्देश दिले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 29/11/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# समर्पित भावनेतून समाजसेवेची मिळाली प्रेरणा!

## आमदार महेश लांडगे यांची भावनिक प्रतिक्रिया

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड - गेली 25 वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. एखाद्या लोकप्रतिनिधीचा वाढदिवस महिनाभर साजरा व्हावा, हा चमत्कार आहे. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यवान समजतो. यावर्षीचा वाढदिवस सफाई व घर कामगार माता-भगिनींना समर्पित करण्यात आला. त्यांचा सन्मान करताना विशेष आनंद वाटला.**

**माझ्यावर प्रेम करणाऱ्या जनसमुदायाच्या उपस्थितीमध्ये कष्टकऱ्यांचा सन्मान करीत विधायक पद्धतीने अभिष्ठचिंतन झाले. समर्पित भावनेतून आणखी सकारात्मक ऊर्जेने समाजसेवा करण्याची प्रेरणा मिळाली, अशी भावनिक प्रतिक्रिया भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी दिली.**



भोसरी येथील ऐतिहासिक गावजत्रा मैदानावर आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवस अभिष्ठचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हजारो दादाप्रेमी नागरिकांनी या ठिकाणी प्रचंड गर्दी केली होती.

वाढदिवसानिमित्त महिनाभरात भोसरी विधानससभा आणि शहर व ग्रामीण भागामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रम असे 100 हून अधिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे पिंपरी-चिंचवड शहरात उत्सवमय वातावरण निर्माण झाले होते.या आनंददायी प्रसंगी, सवपक्षीय लोकप्रतिनिधी आणि स्थानिक स्तरावरील मित्रपरिवाराबरोबरच राज्यस्तरीय अनेक मान्यवरांनी देखील शुभेच्छा दिल्या.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, खासदार छत्रपती उदयनराजे भोसले, तसेच अनेक कॅबिनेट मंत्री, विधान परिषदेचे आमदार, विधानसभा सदस्य यांसह शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनी लांडगे यांना हार्दिक शुभेच्छा आणि पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा संदेश दिला आहे.

महिनाभरात झालेल्या रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे यामधून 2 हजाराहून अधिक पिशव्या रक्तसंकलन झाले आहे. विशेष म्हणजे, 10 हजाराहून अधिक नागरिकांनी आरोग्य शिबिरांमधील विविध सेवांचा लाभ घेतला आहे. तसेच, महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक प्रबोधनाचे उपक्रमांनी शहरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

विशेष म्हणजे, “हिंदुभूषण क्रीडा महोत्सव” यांमुळे तब्बल 10 हजाराहून भोसरीसह संपूर्ण पिंपरी-चिंचवड परिसरात सकस उपक्रमांची रेलचेल दिसून आली. यावर्षीचा वाढदिवस आमदार लांडगे यांनी ”सफाई व घरकामगार माता-भगिनींना समर्पित”केला आहे.

या निमित्त 4 हजार 320 महिलांचा सन्मान करण्यात आला आणि त्यांना भेटवस्तू देण्यात आली. तसेच, संबंधित माता-भगिनींना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.

# स्कॅामी संस्था आयोजित कार्यक्रमाला श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे - शनिवार दिनांक 22 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी एक वाजता माजी सैनिक वसाहत पौड रोड पुणे येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान संस्थेचे संचालक माननीय यशवंत सहस्त्रबुद्धे हे होते तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक चंद्रकांत ओव्हाळ यांनी प्रास्ताविक केले.**



स्कॅामी ही संस्था गेले पंधरा वर्षापासून सामाजिक क्षेत्रात काम करते. अनाथ आश्रम, बालगृहे ,गरीब विद्यार्थी, महिला, तसेच कष्टातून वर आलेल्या मातांचा सन्मान करणे असे कार्य संस्थेने आजपर्यंत केले. कार्यक्रमा निमित्त काव्य संमेलन, आई वरील व्याख्यान , तसेच गझल गायन असे घेण्यात आले. अनेक मान्यवर कवी-कवयित्री यांनी सहभाग घेतला असून गझल गायक अशोक गायकवाड यांच्या सुश्राव्य मराठी गझलीने श्रोत्यांची मने जिंकून त्यांना अश्रू अनावर झाले. तसेच माननीय शैलेश त्रिभुवन यांनी आई तुझ्यापुढे मी ...या विषयावर व्याख्यान दिले. कार्यक्रमात गौरी धुमाळ, मनीषा जोशी , सपना राठोड, जय श्री घनवट ,यांना आदर्श माता पुरस्कार तर माननीय आनंद तायडे शंकर काळंबे, सचिन सहस्रबुद्धे, अशोक गायकवाड, यांना समाज भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन मृण्मयी ओव्हाळ, स्वाक्षरी ओव्हाळ व राजेश चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन स्वप्नात सहस्त्रबुद्धे यांनी करून आभार प्रदर्शन प्रियांका ओव्हाळ यांनी केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 29/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# सराईत आरोपींचा थरारक पाठलाग

## दोन पिस्तुल, 7 जिवंत काडतुसे, घातक हत्यार व सोन्या-चांदीचे दागिने जप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड - शहरातील वाढत्या घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांचा तपास वेगाने लावण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे यांनी गुन्हे शाखेला विशेष आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार व सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-१) डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने धडाकेबाज कारवाई करून तीन सराईत आरोपींना अटक केली.**



२७ नोव्हेंबर २०२५ रोजी युनिट २ चे पथक पेट्रोलिंगदरम्यान तांत्रिक विश्लेषण व गुप्त खबऱ्यांच्या मदतीने कळले की, रावेत पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्रमांक ५६९/२०२५ मधील संशयित आरोपी चोरी केलेल्या वाहनासह सोमाटणे टोलनाक्याकडे येत आहेत. पहाटे सापळा रचून ठेवलेल्या पथकाने मारुती सुझुकी सेलेरिओ (एमएच १४ जेई २६२८) वाहन अडवण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी गावठी पिस्तुलातून पोलिसांवर गोळीबार केला. प्रसंगावधान राखत पोहवा राठोड यांनी आरोपीचे पिस्तुल हिसकावण्याचा प्रयत्न केल्यामुळे गोळी वाहनाच्या टपाला लागून आरपार गेली आणि मोठा अनर्थ टळला.

**तत्काळ कारवाई करत पथकाने तिघा आरोपींना ताब्यात घेतले. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :**

1. सनिसिंग पापासिंग दुधानी (वय २४, रा. हडपसर) - याच्यावर विविध पोलीस ठाण्यांत तब्बल ७० गंभीर गुन्हे दाखल.
2. जलसिंग राजपूतसिंग दुधानी (वय ३२, रा. हडपसर) - याच्यावर ५० गुन्हे दाखल.
3. मनिष बाबुलाल कुशवाह (वय २८, रा. मध्यप्रदेश)

गाडीची झडती घेताना २ देशी बनावटीची पिस्तुल, ७ जिवंत काडतुसे, धारदार शस्त्रे, तसेच चोरीतील सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ₹८,८७,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही धडाकेबाज कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, पोलीस सह-आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त श्री. सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. युनिट २ चे वपोनि अरविंद पवार, पोउपनि साळुंके, सपोफौ गवारे, पोहवा विक्रम कुदळ, पोहवा भाऊसाहेब राठोड, पोहवा तुषार शेटे, पोहवा विक्रांत चव्हाण, पोहवा मोहंमद नदाफ, पोहवा कृष्णा शितोळे, पोशि प्रशांत सैद, पोशि अमर राणे, पोशि सुखदेव गावंडे व पोशि धनंजय जाधव यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.पिंपरी चिंचवड शहर पोलिसांची धडक कारवाई शहरातील वाढत्या घरपोडी व चोरीच्या गुन्हांच्या तपासात तीन सराईत आरोपींना अटक, फिल्मी स्टाईलने आरोपींना अटक करतेवेळी आरोपींच्या वतीने पोलिसांवर गोळीबार करण्यात आला परंतु सुदैवाने कोणालाही

# येरवड्यात बसची सहा वाहनांना धडक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : येरवड्यातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उड्डाणपुलावर भरधाव बसने एकापाठोपाठ सहा वाहनांना धडक दिल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. याप्रकरणी येरवडा पोलिसांनी बसचालकाला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.**




येरवड्यातील गोल्फ क्लब चौकातून लोहगाव विमानतळाकडे जाण्यासाठी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उड्डाणपूल बांधण्यात आला आहे. गोल्फ क्लब चौकातील वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर हा पूल बांधण्यात आला. गुरुवारी रात्री साडेदहाच्या सुमारास उड्डाणपुलावर किरकोळ अपघात झाल्यानंतर मोटार चालक थांबले होते. त्यावेळी भरधाव वेगाने आलेल्या खासगी बसने वाहनांना धडक दिली.

अपघाताची माहिती मिळताच येरवडा पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी बसचालकाला ताब्यात घेतले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातानंर उड्डाणपुलावरील वाहतूक गोल्फ क्लब चौकातून वळविण्यात आली. अपघातग्रस्त वाहने बाजूला काढण्यात आल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली, अशी माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# 1 डिसेंबरपर्यंत करता येणार प्रचार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे नगरपरिषद व नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान सुरु होणार असून प्रचार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता बंद करण्यात यावे;**

प्रचार बंद झाल्याच्या वेळेपासून सभा, मोर्चे, ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही, तसेच निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरात प्रसिध्दी, प्रसारण देखील बंद करावे.जिल्ह्यातील उमेदवारांनी आयोगाच्या निर्देशाचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.



# हुंड्यासाठी महिलेचा खून करणाऱ्या पतीला जन्मठेप




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : हुंड्यासाठी महिलेला बेदम मारहाण करुन तिचा खून करणाऱ्या पतीला वडगाव मावळ जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. के अनभुले यांनी याबाबतचे आदेश दिले. या खटल्यात महिलेने मृत्यूपूर्व दिलेला जबाब महत्त्वाचा ठरला. साक्ष, तसेच पुरावे ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीला जन्मठेप आणि १८ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सियाराम पंचम विश्वकर्मा असे जन्मठेपेची शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. पत्नीचा हुंड्यासाठी छळ करुन तिचा खून केल्याप्रकरणी विश्वकर्मा याच्यासह त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरती सियाराम विश्वकर्मा असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे.आरती आणि आरोपी सियाराम यांचा २ मे २००८ रोजी झाला होता. आरतीच्या कुटुंबीयांच्या परिस्थिती हलाखीची होती. तिच्या भावाने विवाह निश्चित केला. हुंड्यापोटी पाच लाख रुपये देण्याचे ठरले. पहिल्या टप्प्यात भावाने एक लाख रुपये दिले. दरम्यान, आरतीच्या वडिलांचे निधन झाले. आर्थिक परिस्थितीमुळे आरतीच्या भावाला हुंड्यपोटी ठरलेली रक्कम देणे शक्य झाले नाही

# आंतरराष्ट्रीय परिषदेत मानसिक आरोग्यावर विचारमंथन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे: "सार्वजनिक आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि समाजकल्याण विभागाचा यांच्यात योग्य समन्वय साधला, त्याला सामाजिक जनजागृतीची आणि संवेदनशील हाताळणीची जोड मिळाली, तर समाजातील आत्महत्यांचे प्रमाण कमी करण्यात यश मिळेल," असे प्रतिपादन पॉलिसी मेकर्स फोरम फॅार मेंटल हेल्थचे अध्यक्ष, तसेच टाटा ट्रस्टचे वरिष्ठ सल्लागार डॉ. दलबीरसिंह यांनी केले.**



आत्महत्या प्रतिबंधासाठी कार्यरत कनेक्टिंग ट्रस्टच्या वतीने २० व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून, आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत 'आत्महत्या प्रतिबंध आणि मानसिक आरोग्यासाठी नवीन दृष्टीकोन' यावरील विशेष संवादसत्रात डॉ. दलबीरसिंह यांचे 'जर्नी ऑफ द फोरम अँड पॉलिसी चेंजेस' या विषयावर बीजभाषण झाले. यावेळी राज्यसभेच्या माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण, युवा कार्यकर्ते अनीश गावंडे, जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्या डॉ. लक्ष्मी विजयकुमार यांनी विचार मांडले.डॉ. दलबीर सिंह म्हणाले, "मानसिक आरोग्यविषयक सुविधा शहरांपुरती मर्यादित न राहता, जिल्हा व तालुका स्तरावर पोहोचली पाहिजे. एखादी व्यक्ती, विद्यार्थी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आहे, हे ओळखून, त्याला त्वरित आवश्यक ती मदत, दिलासा, समुपदेशन सुविधा उपलब्ध होणे आणि दिवसातील सर्वाधिक काळ विद्यार्थी ज्या शाळेत, कॉलेजमध्ये, विद्यापीठात वावरतात, तिथेच जाणीवजागृती करणे गरजेचे आहे. मानसिक आरोग्य हे सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय घटकांशी जोडलेले असते, हे जागतिक आरोग्य संघटनेकडूनही मान्य करण्यात आले आहे. आत्महत्या प्रतिबंधासाठी सर्व शासकीय, निमशासकीय, खासगी यंत्रणा, संस्था, व्यक्ती यांनी परस्पर समन्वय ठेवत, समुपदेशन आणि जाणीवजागृती करायला हवी."

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 29/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# विद्यार्थ्यांनी रंगवल्या भिंती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसोबत रंगकाम करण्याचा अनुभव म्हणजे जणू पुन्हा शाळेच्या दिवसांत परत गेल्यासारखे वाटले. मुलांचा उत्साह, त्यांची निरागस कल्पनाशक्ती पाहताना माझ्याही शाळेच्या आठवणी जाग्या झाल्या. इतक्या मनापासून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत भिंती रंगवण्याचा हा क्षण खरोखरच खास आणि स्मरणीय ठरला असे मत अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा प्रशिक्षण व अध्ययन संस्था (DIET) यांच्या संयुक्त विद्यमाने भवानीपेठ येथे विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भित्तीचित्र सादरीकरण झाले. या भित्तीचित्र पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर बोलत होत्या.

यावेळी शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर क्षीरसागर, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे उपसंचालक अरुण जाधव, तसेच जिल्हा प्रशिक्षण आणि अध्ययन संस्थेचे प्राचार्य नामदेव शेंडकर, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हा प्रशिक्षण व अध्ययन संस्था (DIET), भवानीपेठ येथे 'निपुण भारत' या विषयावर विद्यार्थ्यांनी जिल्हा प्रशिक्षण व अध्ययन संस्थेच्या भिंतीवर चित्र रेखाटले . फिट इंडिया – हिट इंडिया, निपुण भारत, साक्षर भारत – सक्षम भारत अशा विविध राष्ट्रीय संकल्पनांवर आधारित १८ विद्यार्थ्यांच्या एकूण १८ कलाकृती संस्थेच्या भिंतींवर रेखाटण्यात आल्या. महापालिकेच्या विद्यार्थ्यांनी आणि कला शिक्षकांनी मिळून ही संपूर्ण भित्तीचित्रे साकारली असून कार्यालयीन परिसर अधिक प्रेरणादायी आणि शैक्षणिक बनला आहे.या उपक्रमासोबतच महापालिकेच्या शाळांमधील कला शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शाळांमध्ये उच्च दर्जाचे कला शिक्षण राबवण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत मानधन कला शिक्षकांना आधुनिक कला तंत्र, भित्तीचित्र रचना, रंगांचा वापर आणि सर्जनशील अध्यापन पद्धती याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

शहरी शाळांमध्ये कला-विकासाला चालना मिळावी, विद्यार्थ्यांची सृजनशीलता वाढावी त्यांच्या कलागुंणाना वाव मिळावा हा या संपूर्ण कार्यक्रमाचा प्रमुख हेतू होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचा हा उपक्रम भविष्यातील शैक्षणिक दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या कलात्मक क्षमतेत मोठी भर घालणारा ठरणार आहे.

# 2 डिसेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : नगरपरिषद व नगरपचांयतीच्या सार्वत्रिक निवडणूकीत पात्र मतदारांना मतदान करता यावे याकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.**

जिल्ह्यातील आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरळी देवाची, इंदापूर, जेजुरी, जुन्नर, लोणावळा, माळेगाव बुद्रुक, मंचर, राजगुरुनगर, सासवड, शिरूर, तळेगाव दाभाडे आणि वडगाव या नगरपरिषद व नगरपचांयतीच्या मतदार संघात सुट्टी असणार आहे.

मतदारसंघाच्या क्षेत्रातील जे मतदार कामाकरिता त्या त्या मतदारसंघाच्या बाहेर असणाऱ्यांना मतदारांना देखील लागू राहणार आहे. केंद्र शासनाच्या शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका आदींना सार्वजनिक सुट्टी लागू राहील, येत्या २ डिसेंबर रोजी पात्र मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन डुडी यांनी केले आहे.



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

सस्नेह निमंत्रण

वर्ष तिसरे

# मेट्रो सिटी

## आयकॉन अवॉर्ड २०२५

METRO CITY ICON AWARD 2025

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त

# पुरस्कार सोहळा २०२५

### शुभहस्ते

**मा.श्री.श्रीरंग आप्पा बारणे**
मावळ लोकसभा खासदार

**मा.रोहिणी ताई खडसे**
महिला प्रदेशाध्यक्ष : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष

### प्रमुख उपस्तिथी

**मा.श्री.इरफानभाई सय्यद**
शिवसेना उपनेते

**मा.शैलाजा ताई मोरे**
मा.उपमहापौरपि.चिं.मनपा

**मा.प्रियांका ताई बारसे**
मा.नगरसेविका पि.चिं.मनपा

**मा.सरिता ताई साने**
संघटिका : पिं.चिं.शहर शिवसेना

**मा.श्री.संतोष बारणे**
प्रसिद्ध उद्योजक, पिंपरी चिंचवड

**मा.श्री.पैगंबर शेख**
सामाजिक कार्यकर्ते

दिनांक 07 डिसेंबर 2025 | वेळ सकाळी 11:00 वा.

स्थळ : ग.दि. माडगूळकर नाट्यगृह (मिनी ऑडिटेरियम) आकुर्डी पिं.चिं.शहर

आयोजक

## शबनम न्यूज मिडिया ग्रुप

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स